श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

मार्च २०२२ | वर्ष-१०, अंक-३ | विनामूल्य खासगी वितरणासाठी | मासिक, पाने १६

## स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर पुण्यतिथी



*ॲड. श्री. विनायकराव देशपांडे आणि सौ. वर्षा देशपांडे सावरकरांच्या प्रतिमेला अभिवादन करताना*

डेरवण येथे श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टतर्फे दि. २६ फेब्रुवारी २०२२ रोजी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर पुण्यतिथी आयोजित करण्यात आली होती. यानिमित्त ॲडव्होकेट श्री. विनायकराव देशपांडे, सांगली, यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. ॲड. श्री. देशपांडे यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर आणि लोकमान्य टिळक यांच्या स्मारकांना पुष्पांजली अर्पण करून संस्थेच्या बहुउद्देशीय सभागृहात स्वातंत्र्यवीर सावरकर यांची काव्यसंपदा या विषयावर ओजस्वी व्याख्यान दिले. सभेला विद्यार्थीवर्ग, अध्यापकवर्ग, डॉक्टर्स, कर्मचारी वर्ग तसेच संस्थेचे कार्यकारी विश्वस्त श्री. विकासराव वालावलकर, संस्थेतील कर्मचारी तसेच अन्य स्त्री-पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. ॲड. श्री. देशपांडे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन झाल्यावर विद्यार्थ्यांनी स्वागतगीत सादर केले आणि सूत्रसंचालिका सौ. खांडेकर यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला.

ॲड. श्री. देशपांडे हे गेली सदतीस वर्षे वकील म्हणून सांगली येथे कार्यरत असून राष्ट्रीय स्वयंसेवक आणि विश्व हिंदू परिषदेचे पदाधिकारी आहेत. स्वा. सावरकर यांचे जीवन, कार्य, साहित्य याचे अभ्यासक आहेत. अनेक सामाजिक संस्था आणि उपक्रमात सहभागी असणाऱ्या देशपांडे यांचा सावरकर विचारांचा प्रसार करणे हा ध्यास आहे. त्यासाठी त्यांनी अनेक ठिकाणी व्याख्याने दिली आहेत. 'सावरकरांचे काव्य' या विषयावर आकाशवाणी, दूरदर्शनवर अनेक कार्यक्रम झाले आहेत. श्रीशिवाजी महाराज, समर्थ रामदास, स्वामी विवेकानंद आदी राष्ट्रपुरुषांवरही त्यांनी अनेक व्याख्याने दिली आहेत. ते लोकसेवा आयोगाच्या परीक्षार्थींना मार्गदर्शनही करतात.

''की घेतले न व्रत हे अम्ही अंधतेने । लब्धप्रकाश इतिहास निसर्गमाने । जे दिव्य दाहक म्हणोनि असावयाचे । बुद्ध्याचि वाण धरिले करि हे सतीचे ।।'' या स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या काव्यपंक्तींनी आपल्या व्याख्यानाला सुरुवात करून श्री. देशपांडे म्हणाले, '' आता



*ॲड. श्री. विनायकराव देशपांडे - तेजस्वी जीवनगाथेचे ओजस्वी कथन*

सकाळचे साडे दहा वाजलेत. आजपासून बरोबर ५६ वर्षांपूर्वी दादरच्या 'सावरकर सदना'त हा मृत्युंजय महाकवी मृत्युला आव्हान देत होता. लोक दर्शनासाठी विनवीत होते. सावरकर म्हणत होते, की अखंड भारतासाठी आसेतू हिमाचल झंझावाती दौरे करणारा सावरकर तुम्हाला बघायचा आहे की शरपंजरी पडलेल्या भीष्मासारखा सावरकर तुम्हाला बघायचा आहे? की ज्याने स्वत:च्या तत्त्वासाठी ध्येयासाठी, काहीही आंधळेपणाने न करणारा, इतिहासाने आणि निसर्गाने जे ठामपणे सिद्ध केले आहे अशा सत्याचा पाठपुरावा करणारा, समजून उमजून हे सतीचे व्रत स्वीकारणारा सावरकर तुम्हाला पहायचा आहे?

सावरकरांची कुंडली पाहून एका ज्योतिषाने असे सांगितले होते की ही एका अलौकिक माणसाची कुंडली आहे. याचे आयुर्मान ९४ वर्षांचे आहे, पण तो स्वत:च्या इच्छेने अकरा वर्षे आधीच आपला मृत्यू ओढावून घेणार आहे. सावरकर ८३व्या वर्षी, आजपासून छपन्न वर्षांपूर्वी याच वेळी म्हणजे दहा वाजून चाळीस मिनिटांच्या दरम्याने मृत्यूला आव्हान देत होते. 'मृत्यूशीच गाठ घालू मी घुसे रणी।' ते स्वातंत्र्य संग्रामाच्या रणात घुसले. कुठेतरी थोडं सूत कातलंय, थोडा आंदोलनात भाग घेतलाय आणि आजन्म बायकामुलांसह स्वातंत्र्यसैनिक म्हणून मानसन्मान उपभोगताहेत या वर्गातले स्वातंत्र्यसैनिक ते नाहीत!

वासुदेव बळवंत गेले, त्यांचा लढा चाफेकर बंधूंनी पुढे नेला. चाफेकर बंधूंनी हौतात्म्य स्वीकारले. चाफेकर बंधूंनंतर कोण? सावरकर म्हणाले, ''मीच या देशाच्या स्वातंत्र्यासाठी सशस्त्र क्रांतीचा सेतू उभारून, शत्रूला मारता मारता मरेतो झुंजेन!'' त्या वेळी त्यांचे वय होते फक्त अकरा वर्षे! आयुष्यभर त्यांनी ती प्रतिज्ञा तंतोतंत पाळली. 'आपणासारीखे करीती तात्काळ।' असे आध्यात्मिक भाषेत म्हणतात. सावरकरांच्या सहवासात जे जे आले, ते ते क्रांतिमय होऊन गेले. १९१० नंतर अंदमानात जो जो त्यांच्या संपर्कात आला तो शुद्धिमय होऊन गेला! १९२४ ते ३७ या काळात रत्नागिरीतील वास्तव्यात जो त्यांच्याजवळ आला तो अखंड हिंदू समाजाच्या समरसतेचे चिंतन आणि आचरण करणारा होऊन गेला. सन १९३७ ते १९४७, सावरकर हा देश स्वतंत्र व्हावा, अखंड रहावा, अखंड हिंदूराष्ट्र व्हावे म्हणून तळमळत होते, फिरत होते, लोकांना जागं करीत होते. शामाप्रसाद मुखर्जींसारखा वयाच्या तेहेतिसाव्या वर्षी कुलगुरू झालेला एक माणूस सावरकरांना भेटताच हिंदू महासभेत सामील झाला. हिंदूच कशाला, इंग्लंडमध्ये असताना त्यांच्या क्रांतिकार्यात चार मुस्लिम तरुण सामील झाले होते. मुस्लिमच नव्हे तर ख्रिश्चन, गोऱ्या कातडीच्या ब्रिटिश लोकांनी सावरकरांच्या कार्यात भाग घेऊन, सावरकरमय होऊन, अकरा महिन्याची शिक्षाही भोगली आहे!

चौदाव्या वर्षी शपथ घेतल्यापासून ते मृत्यूला आव्हान देत होते, 'असेल हिंमत तर ये माझ्यासमोर!' दहा जुलै १९१० रोजी मृत्यू खरंच सावरकरांना भेटायला आला!. मार्सेलिस बंदरात गोळ्यांचा पाऊस पडतोय! पण सावरकरांनी मृत्यूकडे पाहिले आणि मृत्यू पळून गेला! अंदमानात वेगवेगळ्या मार्गांनी मृत्यू जवळ आला, पण त्याचे झेप घालायचे धाडस झाले नाही. किमान सात वेळा असे झाले. रत्नागिरीच्या तुरुंगात असतानाही एकदा सावरकरांना क्षणभर आत्महत्या करण्याचा मोह पडला होता. पण सावरकर म्हणाले असा नेभळ्यासारखा मी मरणार नाही, शत्रूला मारतामारता मरेन.

३ फेब्रुवारी (१९६६) पासूनच सावरकर मृत्यूला बोलावत होते, पण मृत्यूचे धाडस झाले नाही. अखेर आजपासून ५६ वर्षांपूर्वी याच वेळी, म्हणजे १० वाजून ५८ मिनिटांनी मृत्यू सावरकरांना भेटला! या अखेरच्या क्षणी सावरकर रामदासांचे स्मरण करत होते. भागानगरमध्ये ज्यांची सोन्याची मूर्ती बसविली आहे त्या रामानुजाचार्यांचे स्मरण करीत होते, शंकराचार्यांचे, ज्ञानोबांचे, तुकोबांचे स्मरण करीत होते. ज्या मार्गाने हे सर्व जण गेले त्या मार्गानेच सावरकर गेले. 'मी माझ्या हिंदू संस्कृतीच्या ऋषी-मुनींच्या मार्गाने जात आहे, कुठल्याही पळपुट्या मार्गाने जात नाही आणि आता या शरीराचे हाल करावेत असे मला वाटत नाही!' अशी त्यांच्या प्रायोपवेशनामागील भूमिका होती.

सावरकरांची क्रांतिकार्याची सुरुवात काव्यानेच झाली आणि ज्या वेळी मृत्यू त्यांच्याजवळ आहे त्या वेळीही त्यांना ''धन्योहं धन्योहं कर्तव्यं में न विद्यते किंचित । धन्योहं धन्योहं प्राप्तव्यं सर्वमद्य संपन्नम ।।' हेच पंचदशीतील वचन आठवले असेल. 'अरे आता माझ्या काही इच्छा राहिलेल्या नाहीत. मला देश स्वतंत्र झालेला पहायचा होता. तो तीन चतुर्थांश का होईना, स्वतंत्र झालेला मी पाहिला. मृत्यो, आता तू ये! आता तू ये!' असे सावरकर मृत्यूला सांगत होते.

एक मनुष्य आयुष्यात काय काय करू शकतो याची यादी करायला बसले तर सावरकरांच्या बाबतीत सगळी वही भरली तरी



*श्रोतृवृंद*

त्यांचे काहीतरी कर्तृत्व शिल्लकच राहील. मी जेव्हा सावरकरांच्या काव्याचा अभ्यास करायला लागलो तेव्हा काही काळानंतर असे वाटले की सावरकरांच्या सगळ्या काव्याचा आपला अभ्यास झाला. पण चार-पाच वर्षांपूर्वी लक्षात आले की सावरकरांनी अंदमानात उर्दूतही काव्य लिहिले आहे. पण ते अन्य उर्दू काव्यासारखे प्रेमाविषयी नाही. ते त्यांच्या मराठी काव्याचा उर्दूतील अनुवाद आहे. सावरकर म्हणतात, 'अंदमानाच्या कोठड्या ओसंडून भरून वाहू देत म्हणजे मग माझी मातृभूमी स्वतंत्र होईल. सावरकरांची काव्ये जसजशी लोकांसमोर येतील तसे त्यांचे वेगवेगळे पैलू लोकांना ज्ञात होतील.

भगूरमधे एका श्रीमंत घरात जन्मलेला एक लहानसा प्रतिभावंत मुलगा, परंतु त्याही वयात लोकमान्यांचे केसरीचे अंक, 'काळ'कर्त्या परांजप्यांचे काळचे अंक त्यांच्या हाती पडले आणि हा माणूस पेटून उठला. माणूस काव्य केव्हा करतो? दूध केव्हा ओतू जाते? भांड्याची त्या दुधातील ऊर्जा धारण करण्याची क्षमता संपते तेव्हा! माणूस काव्य केव्हा करतो? आपल्या भावना धारण करण्याची क्षमता संपते, आता मला व्यक्त व्हायलाच पाहिजे असे त्याला तीव्रतेने वाटते तेव्हा! सावरकरांना अंदमानात कागद, लेखणी काहीच मिळाले नाही. तरी पण त्यांना ती प्रतिभा, ऊर्जा स्वस्थ बसू देईना!

सावरकरांचे 'जयोस्तु ते!' हे काव्य प्रत्येक स्वतंत्र राष्ट्राचे राष्ट्रगीत, प्रेरणामंत्र आणि ध्येयमंत्र व्हायला पाहिजे अशा त्याच्यामध्ये एकापेक्षा एक कल्पना आहेत. 'राष्ट्राचें चैतन्य मूर्त तूं नीति-संपदांची ।'... सावरकर म्हणतात की स्वातंत्र्य नसेल तर ते राष्ट्र मेल्यासारखे आहे. 'स्वतंत्रते भगवती ! श्रीमती राज्ञी तू त्यांची।'... पुढे ते म्हणतात, 'मोक्ष, मुक्ती हीं तुझीच रूपें तुलाच वेदांती । स्वतंत्रते भगवती ! योगीजन परब्रह्म वदती।'... स्वतंत्रते, तू जर नसशील तर आम्हाला मोक्ष किंवा मुक्तीही मिळणार नाही! पारतंत्र्यात धार्मिक अधिकारही नसतात. 'तुजसाठीं मरण ते जनन - तुजवीण जनन ते मरण '... स्वातंत्र्यासाठी मेलो तर तेच जगण्यासारखे आहे. पारतंत्र्यात जगणे म्हणजे मरण येत नाही म्हणून जगणे!

घरासाठी काढलेले कर्ज फेडायला, बायकामुलांच्या संगोपनासाठी, पुढच्या पिढ्यांच्या तरतुदीसाठी जगणे हे खरे नव्हे. स्वातंत्र्य कुणाला पाहिजे? मॅझिनीच्या पुस्तकाला प्रस्तावना लिहिताना सावरकर म्हणतात, 'मनुष्य नावाचा प्राणी ईश्वराने स्वतंत्र राहण्यासाठी निर्माण केला आहे. केवळ इटली नाही तर प्रत्येक देश स्वतंत्र झाला पाहिजे. ते पंचाहत्तर हजार शिपुर्डे तुमच्या दोन कोटी लोकांना कसे कोंडून ठेवू शकतात. या देशाचे स्वातंत्र्य मिळेपर्यंत कुठलेही सूख उपभोगायचा मला अधिकारच नाही!'

जयोस्तुतेमध्ये जे ऐकवले जात नाही असे एक पुढचे कडवे आहे. सावरकरांनी अगदी लहानपणी हे काव्य एका तासात लिहिले आहे. त्याचे शेवटचे कडवे -

हिमालयाच्या हिमसौधांचा लोभ शंकराला ।
क्रीडा तेथें करण्याचा कां तुला वीट आला?
होय आरसा अप्सरसांना सरसें करण्याला ।
सुधाधवल जाह्नवीस्रोत तो कां गे त्वां त्यजिला? ॥
स्वतंत्रते! या सुवर्णभूमिंत कमती काय तुला ?
कोहिनुरचे पुष्प रोज घे ताजें वेणीला ॥
ही सकल-श्री-संयुता ! आमुची माता! भारती असता ।
कां तुवां ढकलुनी दिधली?
पूर्वीची ममता सरली । परक्यांची दासी झाली
जीव तळमळे, कां तूं त्यजिलें उत्तर द्याचें दे ।
स्वतंत्रते भगवती! त्वामहं यशोयुतां वंदे ॥

सावरकर स्वतंत्रतादेवीला विचारताहेत की हिमालयाचा तुला का वीट आला आहे? त्या अप्सरांना स्वर्गात वेणीफणी करायला आरसा मिळाला नाही म्हणून त्या गंगेच्या प्रवाहात पाहून वेणीफणी करताहेत, असा गंगेचा प्रवाह तू का त्यागलास? तुला वेणीत घालायला फूल म्हणून येथे कोहिनूरसारखे हिरे आहेत. असे असताना तू आम्हाला सोडून का गेली आहेस?

सावरकर म्हणताहेत - हे अधम रक्तरंजिते! सुजन पूजिते ! श्रीस्वतंत्रते... म्हणजे काय? आधी मोगलांनी राज्य केले, मग इंग्रजांनी केले. आम्हाला स्वातंत्र्य मिळवायचे आहे. पण ते सुखासुखी, फुकाफुकी, अर्ज-विनंत्या करून मिळत नसते. मग काय केले पाहिजे? वासुदेव बळवंतांसारखी क्रांती केली पाहिजे! चाफेकर बंधू, भगतसिंग-सुखदेव यांच्यासारखे हौतात्म्य पत्करले पाहिजे. हे अधम रक्त रंजिते - रॅन्डला मारलंच पाहिजे, कर्झन वायलीला मारलंच पाहिजे, ओल्डवायरला हाणलाच पाहिजे! अशा अधमांच्या रक्ताचा अभिषेक स्वातंत्र्यदेवीला पाहिजे! शत्रूला मारताना आमचे रक्त सांडणारच की! हे काव्य बाहेर आले आणि सावरकरांच्या अभिनव भारत संघटनेत २०० तरुण जमा झाले. या तरुणांनी मॅझिनीच्या आत्मचरित्राची प्रस्तावना पाठ करून टाकली होती, कारण सावरकर म्हटले की बंदी! सावरकर म्हटले की विरोध! सावरकर म्हटले की अपमान!

सावरकरांवर पहिली बंदी त्यांच्या वडिलांनी घातली. ते सीधे-साधे संसारी गृहस्थ होते. त्यांनी सावरकरांनी लिहिलेला चाफेकर बंधूंवरील फटका वाचला. काय कल्पना केल्या होत्या त्या चौदा वर्षाच्या मुलाने! वासुदेव हरी चाफेकर, दामोदर हरी चाफेकर फासावर गेलेत! सावरकरांनी वर्णन केलंय की तो नवरा मुलगा बोहल्यावर चढलाय. अंतर्पाट धरलाय. पलीकडे बायको कोण आहे? कीर्तीसुंदरी! या लग्नात गणपती कोण पुजला? बाळ गंगाधर टिळक! अशा कल्पना असलेला तो फटका वाचून त्यांचे वडील म्हणाले की असले काहीतरी लिहू नकोस बाबा! न्यायमूर्ती तेलंग, न्या. रानडे यांच्यासारखी काहीतरी देशसेवा कर. त्यांनी तो फटका फाडून टाकला! बाबारावांच्या पत्नीने, सावरकरांच्या वहिनीने तो सुदैवाने पाठ केला होता म्हणून तो आज उपलब्ध आहे. पुढे सावरकरांनी पुण्याला आल्यावर स्वतंत्रतेचे स्तोत्र लिहिल्यावर बाजीप्रभू आणि तानाजीचे असे दोन पोवाडे लिहिले. त्यात असा काही कल्पनाविलास आहे की लहान वयात असे काही लिहिता येते याच्यावर कोणाचा विश्वासच बसणार नाही.

तानाजी पडल्यावर पळणाऱ्या मावळ्यांना सूर्याजी म्हणतो, 'तो दोर मी कापून टाकलाय!' सावरकर लिहितात, 'अहो षंढ तो दोर

मघाची लढोनिया पडला।' असे शब्द ऐकून मराठे परत फिरले आणि त्यांनी विजय मिळविला. तानाजीचे अंत्यसंस्कार केले त्याचे वर्णन सावरकर असे करतात – 'मग त्या गडची भूमी ठेवी तानाजीस उदरी । तेव्हापासुनी रत्नाकर बहु तीचा द्वेष करी ।... समुद्राच्या पोटात हजारो रत्ने आहेत. पण भूमीच्या पोटातील या रत्नाच्या तोडीचे एकही रत्न नाही म्हणून तो द्वेष करायला लागला आहे!'

बाजीप्रभूंच्या पोवाड्यातील हे वर्णन पहा! सावरकर लिहितात – 'बाजीप्रभू लढायला लागले. बाजीप्रभूंनी शत्रूचे दोन हल्ले परतवून लावले. पण बरेचसे मावळे धारातीर्थी पडले. तिसरा हल्ला आला. बाजीप्रभू विचारतात, 'तोफांचे बार झाले का?'' मावळे सांगतात,

'काय वाजलें बाजीराया बार न गडीं झाला । शिळा कोसळे, पान सळसळे, पक्षी ओरडला।' रक्तबंबाळ बाजी पुन्हा तलवार घेऊन उठतो – 'लढा तरी मग उठा वीर हो रणात घुसलो मी । रक्तें मढवु लढवु खिंडीची तसू तसू भूमी ।' पुढे बाजी म्हणतात – 'शपथ तुम्हाला वृक्ष–पक्षी–जल शिला– तेज –वारें । आम्ही पडता तोफेपूर्वी लढा तुम्ही सारे ।' ... बाजीप्रभू लढतच होते. बार झाले आणि मग बाजीप्रभूंनी देह ठेवला. सावरकर पुढे वर्णन करताहेत – बाजीप्रभूंना न्यायला साक्षात स्वातंत्र्यदेवी आली आहे. सोन्याचा रथ घेऊन आली आहे. समोर तीनशे मावळे आहेत म्हणून स्वातंत्र्यदेवीने संपूर्ण पावनखिंडीचाच रथ केला आहे आणि बाजीप्रभूंसमवेत ते तीनशे मावळेही स्वर्गाला गेले आहेत! पुढे सावरकर लिहितात – 'अहो बंधुनो ! पूर्वज ऐसे स्वतंत्र रणगाजी । स्वतंत्र त्या पूर्वजा शोभतां वंशज का आजी? । विनवि विनायक ह्यांतिल घ्यावें समजुनी अर्थाला । चला घालु स्वातंत्र्यसंगरी रिपूवरी घाला ।' पोवाड्याची सुरुवात 'जयोस्तुते श्री महन्मंगले शिवास्पदे शुभदे । स्वतंत्रते भगवती! त्वामहं यशोयुतां वन्दे ।' अशीच करतात. 'स्वतंत्रते भगवती! या तुम्हि प्रथम सभेमाजी । अम्ही गातसो श्रीबाजींचा पोवाडा आजी ।' बाजीप्रभूंचे वर्णन करून ते प्रेक्षकांना विचारतात की तुम्ही त्यांचे वंशज शोभता की नाही?

लो. टिळकांच्या काळात मागे एकदा रायगडावर कार्यक्रमात तरणीबांड शाहीर मंडळी हा पोवाडा म्हणू लागली. अध्यक्ष होते थोडे भित्ऱ्या स्वभावाचे. त्यांचे बी.पी. वाढले. ते अस्वस्थ झाले. टिळकांनी त्यांना डोली करून खाली पाठवून दिले आणि अध्यक्षपदी शिवरामपंत परांजप्यांना बसविले. सावरकरांचा पोवाडा ऐकायला काळीज कसे लागत होते हे समजावे म्हणून हा प्रसंग सांगितला.

स्वातंत्र्यपूर्व काळात सावरकरांचे शब्दसुद्धा ऐकून घ्यायला माणसे घाबरत होती. आणि सावरकरांनी तर हे व्रतच घेतले होते.

पुढे सावरकर लंडनला गेले. कशाला? 'सागरा प्राण तळमळला' या कवितेत ते म्हणतात , 'तव अधिक शक्त उद्धरणी मी ।' मी अधिक शक्ती मिळविण्यासाठी जात आहे. सावरकरांच्या अखेरच्या दिवसात काही तरुण त्यांना भेटायला आले होते. त्यांनी विचारले की आपण इंग्लंडमध्ये का गेलात? सावरकर म्हणाले की आपल्या देशात त्या वेळी एखादी बंदूक, एखादी गोळी बघायलाही मिळत नसे. इंग्लंडला जाऊन बॉम्ब बनविण्याची विद्या शिकावी, पिस्तुले कशी चालवतात ते शिकावे, ते शिकून इकडे यावे यासाठी आम्ही इंग्लंडला गेलो. त्या वेळी मदनलाल धिंग्रांसारख, सेनापती बापटांसारखे पाचशे तरुण तेथे सावरकरांभोवती गोळा झाले होते. तेथून येथे येऊन इंग्रजांना गोळीनेच उत्तर द्यावे या विचाराने सावरकर इंग्लंडला गेले होते. मौजमजेसाठी नाही. सावरकरांनी अभिनव भारत ही संघटना काढली. छत्रपती शिवाजीमहाराजांच्या प्रतिमेसमोर तुपाच्या दिव्यावर हात ठेऊन त्यांना शपथ घ्यावी लागे. सावरकर सर्वांना पारखून घेत होते. त्यात चार मुस्लिम तरुणही होते. जो देशासाठी लढेल तो माझा! एका मुस्लिम क्रांतिकारकाने सावरकरांचे १८५७ चे पुस्तक कुराणशरीफच्या पानात घालून आणले! त्यांची नावे सांगतो– आर.एम. शेख, नंतर पंजाबचा मुख्यमंत्री झालेला सर सिकंदर हयात खान, असफ अली आणि चौथा होता त्याला सावरकरांनी सैन्यात पाठविले. स्पेन विरुद्ध मोरक्को युद्ध सुरू होते. सावरकरांनी त्याला तिकडे पाठवला. आणि दुसरा होता एक दत्त नावाचा तरुण. काहीतरी करून सावरकरांनी त्यांना बंदुका मिळवून दिल्या आणि पाठवले. आपला काय संबंध होता? पण सावरकर म्हणाले, 'जा! मिळाली संधी तर स्पेनकडून लढा. नाही मिळाली तर मोरक्कोकडून लढा! बंदुका कशा असतात. युद्धभूमी कशी असते, कसं तेथे वावरायला लागतं या सगळ्या गोष्टी तुम्हाला येथे बसून कोण शिकवणार?'

प्रेरणा मिळाली की कसे होते पहा! पांडुरंग सदाशिव बापट (सेनापती बापट) यांची एक रशियन मैत्रीण होती. तिच्याकरवी त्यांनी बॉम्ब बनविण्याची विद्या रशियन क्रांतिकारकांकडून मिळवली. त्यासाठी त्यांनी तिला परीक्षेलाही बसू दिलं नाही! ते भारतात आले, टिळकांना भेटले, क्रांतिकारकांना भेटले आणि बॉम्ब कसा करायचा हे शिक्षण सगळीकडे झाले. नंतर अनंत कान्हेरे यांनी ज्या पिस्तुलाने खून केला ते सावरकरांनी भगवद्गीतेच्या पुस्तकातून पाठविले होते. विनायक देशपांडे नावाच्या क्रांतिकारकाने बायकोचे दागिने विकले. क्रांतिकार्यासाठी पैसे आणायचे कुठले? तात्पर्य, त्या वेळी एक बंदूक, एक गोळी मिळवणे अवघड होते. पण सावरकरांनी तरुणांना तयार केले. त्यांना प्रेरणा कोणाची असेल तर 'अठराशे सत्तावनचे स्वातंत्र्यसमर!'

या पुस्तकाची प्रस्तावना दीडशे तरुणांनी पाठ केली होती. कारण काही लिहायचे नाही, छापायचे नाही! सावरकर आणि त्यांचे मित्र दरेकर यांनी रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळाले ही कविता लिहिली. रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळेना । हा भूतकालिन सिद्धांत जाणा । स्वराज्येच्छुने पाहिजे युद्ध केले । रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळाले? । बाबाराव सावरकरांनी ती छापली म्हणून त्यांना दुसऱ्या कोणत्यातरी आरोपात अंदमानात पाठवले!

मग हे छापणार कोण? म्हणून लोकांनी वैदिक परंपरेसारखे ते पाठ करून टाकले. मॅझिनीच्या चरित्राच्या प्रस्तावनेतील दोन वाक्ये सांगतो म्हणजे त्यात काय होते आणि त्यावर का बंदी घातली हे लक्षात येईल. सावरकर लिहितात – 'मॅझिनीने सांगितले गुप्त मंडळे स्थापन करा आणि मग गुप्त मंडळे स्थापन झाली. आणि मग सैनिकच

नव्हे तर बायका-मुले, म्हातारे-कोतारे, आचारी-वाढपी मिळेल ते हत्यार घेऊन रस्त्यावर उतरला, म्हणून त्यांना स्वातंत्र्य मिळाले. आपण त्यांच्याकडून प्रेरणा घेणार की नाही?' इंग्रजांच्या लक्षात आले की स्वातंत्र्य चळवळीला सावरकरांची प्रेरणा आहे. आणि त्यांनी खरे-खोटे कसलेही आरोप लादून सावरकरांना पकडायचे ठरवले. सावरकर त्या वेळी पॅरिस येथे होते. सन १९१० सालच्या त्या क्षणापासून आजतागायत सावरकरांवर खोटे आरोप करायचे आणि त्यांना बदनाम करायचे हे काम सगळे राष्ट्रद्रोही करीत आले आहेत. सावरकर १९१० ला पॅरिसहून लंडनला आले. सावरकर द्वेष्ट्यांनी अशी हाकाटी उठवलेली आहे की त्यांना त्यांच्या एका मैत्रिणीने पत्र पाठवून जाळ्यात ओढले. असफ अली म्हणाले, 'सावरकरांची प्रेयसी, मैत्रीण, मातृदेवता, इष्टदेवता, स्थानदेवता जर कोण असेल तर ती मातृभूमीच आहे. अन्य कोणी नाही.' सूर्यालाही ग्रहण लागते पण ग्रहण संपताच तो पुन्हा तेजाने लखलखू लागतो. तसे सावरकरांवर केलेले आरोप काळाच्या ओघात खोटे सिद्ध झाले, मग तो माफी मागण्याचा असो की गांधीहत्येचा.

सावरकरांना पकडून इकडे आणण्यात आले. भारताच्या या स्वातंत्र्यवीराच्या मुक्ततेसाठी अनेक क्रांतिकारकांनी प्रयत्न केले हे स्वाभाविकच आहे. पण गाय आल्ड्रेन आणि डेव्हिड गार्नेट ही दोन नावे लक्षात ठेवा. सावरकरांना सोडविण्यासाठी हे दोन इंग्रज प्रयत्न करीत होते. सावरकरांना कोर्टात आणताना त्यांची गाडी पंक्चर करून त्यांना सोडवण्याची एक योजना होती. दुसरी योजना होती बुरखा घालून सावरकरांऐवजी त्यांच्या जागी या इंग्रजाने बसायचे. सावरकरांसाठी आपला प्राण द्यायला हे इंग्रज तयार होते.

मदनलाल धिंग्राने कर्झन वायलीचा वध केला. तो म्हणाला की इंग्लडच्या भूमीवरच इंग्लिश रक्त सांडवायचे हा माझा निश्चय होता हे मी ठामपणे मान्य करतो. त्याला प्रेरणा अर्थातच सावरकरांची होती. तरीही दोन ब्रिटिश सावरकरांसाठी प्राण द्यायला तयार होतात म्हणजे सावरकरांची प्रेरणा केवढी होती! सावरकरांचा खटला चालवण्यासाठी त्यांनी पाउंड-पाउंड गोळा करून निधी उभारला. जसं ब्रिटिशांना त्यांचे स्वातंत्र्य प्रिय आहे तसेच भारतीयांनाही त्यांचे स्वातंत्र्य मिळालेच पाहिजे असे त्यांनी ब्रिटिश न्यायालयापुढे सांगितले. ब्रिटिश न्यायालयात केस चालती तर त्यांना फारतर ३-४ वर्षांची शिक्षा झाली असती. म्हणून चर्चिलच्या आदेशावरून त्यांना भारतात परत पाठवायचे ठरले. भारतात त्यांना फाशी देणे वा अंदमानात धाडणे सोपे, म्हणून त्यांना बोटीने भारतात पाठविण्यात आले. आपल्याला मदत करणाऱ्या या ब्रिटिश मित्रांचे आभार मानून ते बोटीत बसताना त्यांना म्हणाले, की मित्रांनो तुम्ही माझ्यासाठी खूप केले आहे. आता आपली भेट 'मार्सेलिसला'!

मार्सेलिसला पुन्हा एकदा मृत्यू सावरकरांना भेटायला आला. मार्सेलिस बंदरात बोट आल्यावर सावरकर संडासमध्ये विधी करण्याच्या बहाण्याने गेले. पोर्टहोलची काच फोडून त्या लहानशा पोर्टहोलमधून सावरकरांनी योगविद्येच्या साहाय्याने बरगड्या आकुंचित करून स्वत:ला बाहेर झोकून दिले. काचेचे तुकडे लागून रक्त आले. समुद्राचे खारे पाणी झोंबू लागले. सावरकरांनी समुद्रात उडी घेतल्याचे लक्षात आल्यावर पोहणाऱ्या सावरकरांवर गोळ्यांचा वर्षाव झाला. मृत्यू सामोरा आला. मृत्यूला हुलकावणी देऊन, किनाऱ्यावरची भिंत चढून सावरकर ओल्या कपड्यानिशी सुटकेसाठी धावू लागले. सावरकरांना फ्रेंच येत नव्हते आणि फ्रेंच लोक इंग्लिश बोलत नाहीत. सावरकर 'मला अटक करा' असे फ्रेंच लोकांना सांगत होते. पण ब्रिटिश पोलिसांनी येऊन फ्रेंच लोकांना पैसे देऊन सावरकरांना ताब्यात घेतले. मादाम कामा आणि व्ही. व्ही. एस. अय्यर तेथे पाचच मिनिटे उशिरा आले. अन्यथा इतिहासाला वेगळे वळण लागले असते. एकदा बाबासाहेब पुरंदऱ्यांनी सावरकरांना विचारले, 'तात्या, आपली उडी यशस्वी झाली असती तर आपण काय केले असते?' सावरकर लगेच म्हणाले, 'सुभाषबाबूंनी जे दुसऱ्या महायुद्धात केले ते मी पहिल्या महायुद्धात केले असते!' तसे झाले असते तर भारताला स्वातंत्र्य १९१९ सालीच मिळालं असतं असं सावरकरांचं कर्तृत्व होतं!

सावरकरांच्या डोक्याला जेव्हा ब्रिटिश पोलिसांनी पिस्तूल लावले तेव्हा सावरकर एक काव्य मनात म्हणत होते. 'अनादी मी अनंत मी, अवध्य मी भला । मारील रिपु जगती असा कवण जन्मला । अग्नी जाळी मजसी ना खड्ग छेदितो । भिऊनी मला भ्याड मृत्यू पळत सुटतो । खुळाऽ रिपूऽ । तया स्वयें मृत्युच्याचि भीतिने भिववु मजसि ये ।। लोटिं हिंस्र सिंहाच्या पंजरी मला । नम्र दाससम चाटिल तो पदांगुला। कल्लोळीं ज्वाळांच्या फेकिशी जरी । हटुनि भंवती रचील शीत सुप्रभावली । आण तुझ्या तोफांना क्रूर सैन्य तें । यंत्र तंत्र शस्त्र अस्त्र आग ओकते । हलाऽहलाऽ । त्रिनेत्र तो । मी तुम्हास तैसाचीचि गिळुनि जिरवितो ।'....सावरकर म्हणतात की तुम्ही मला फासावर चढविण्यासाठी नेत आहात. आणि पळून जाणे हा माझा धर्म होता आणि त्याप्रमाणे मी वागलो आहे. पण लक्षात ठेवा, मी माझ्या बायकोचे कुंकू पुसून बाहेर पडलो आहे. तुम्ही जर माझा अगर माझ्या मातृभूमीचा अपमान केलात तर ते मी सहन करणार नाही. मरायला तयार असाल तरच मला स्पर्श करा. या तीन कडव्याच्या कवितेत सावरकरांनी गीतेचे, योगवसिष्ठातले सर्व तत्त्वज्ञान अधोरेखित केले आहे. सावरकरांच्या आयुष्याचे एक सूत्र आहे. अत्यंत प्रतिकूल तेच घडेल. आत्यंतिक प्रतिकूल म्हणजे काय? तर फाशी होईल! मग त्यांनी एक पत्र लिहिले, 'पहिला हप्ता'! 'मानुनी घे साची, जननी गे मानुनी घे साची । अल्प स्वल्प तरी । सेवा अपुल्या अर्भक बालाची ।। ध्रु.।। ऋण हें बहु झालें । तुझ्या स्तनीचें स्तन्य पाजुनि धन्य अम्हां केलें । ऋण तें फेडाया । हप्ता पहिला तप्त स्थंडिलिं देह अर्पितो हा ।' या काव्यात ते म्हणतात, 'भारतमातेचे माझ्यावर ऋण आहे. त्याचा पहिला हप्ता म्हणून मातृभूमीचे स्तन्य पिऊन पोसलेला हा देह स्वातंत्र्य यज्ञाच्या वेदीवर अर्पण करीत आहे. मी पुन्हा जन्म घेईन. मी मेलो तरी भारतातील तीस कोटी लोक कृष्णाच्या, रामाच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्य मिळवतील.'

२४ ऑक्टोबर १९१० रोजी सावरकरांना २५ वर्षांची शिक्षा झाली. ३० जानेवारी १९११ रोजी आणखी २५ वर्षांची शिक्षा झाली. सावरकर म्हणाले तुमचे राज्य तरी ५० वर्षे राहणार आहे का? सावरकरांचे खरे काव्य अंदमानात जन्माला आले. सावरकरांना अंदमानात असे कष्टाचे काम दिले होते की एकतर ते थकून मरावेत, किंवा त्यांनी आत्महत्या करावी किंवा माफी मागावी. सावरकरांनी यातील काही केले नाही. ते अंदमानात ९ वर्षे २० महिने आणि अठ्ठावीस दिवस आहेत. रामानुजाचार्य, गौतम बुद्ध असे अनेक जण त्यांना आठवले. ते म्हणाले की मी तर केवळ २७ वर्षांचा आहे. ५० वर्षांनी सुटल्यावर ७७ व्या वर्षापासून मी पुन्हा काम करीन जसे रामानुजाचार्यांनी केले, कबीराने केले, समर्थांनी केले, पुष्कळ मोठ्या लोकांनी केले. मग या ५० वर्षात काय करणार? सावरकर म्हणाले मी जेव्हा बाहेर पडेन तेव्हा एक महाकाव्य अर्पण करीन. त्यांच्याकडे एखादा कागद, एखादी लेखणी सापडली तर त्यांना दंडाबेडीची शिक्षा होत होती. आणि सावरकर म्हणतात की मी महाकाव्य लिहीन!

एका कवीने वर्णन केलं आहे, 'अंदमानच्या सांगती भिंती । कविता इथे माझ्या अंगावरच खेळत होती ।' सावरकरांनी भिंतीचा कागद केला. विटकरीची लेखणी केली आणि कविता लिहायला सुरुवात केली. अकरा महिने कविता लिहायच्या. पुढच्या एक महिन्यात त्या पाठ करायच्या. दरवर्षी भिंतीला रंग काढायचे तेव्हा सावरकर म्हणायचे, 'बरं झालं, बारीबाबाने नवीन कागद दिला. नवी कविता लिहायची. सुटून बाहेर जाणाऱ्या कैद्याकडून ती पाठ करून घ्यायची. कलकत्त्यात डॉ. हेडगेवार, नारायणराव सावरकर (धाकटे बंधू) शिकताहेत. अंदमानात तीनच मराठी कैदी होते. सावरकर, बाबाराव सावरकर आणि वासुदेवराव जोशी.

सावरकरांनी हिंदी भाषिक कैद्यांडून कविता पाठ करून घेतल्या. त्या कैद्यांनी कलकत्त्यात आल्यावर त्या म्हणून दाखविल्या आणि नारायणरावांनी त्या लिहून घेतल्या आणि रवींद्रनाथांकडे पाठवल्या. ही गुप्त कामगिरी बहुधा हेडगेवारांवरच सोपविलेली असणार ! भारत म्हणजे मेलेले राष्ट्र, भारत म्हणजे गुलामांचे राष्ट्र, भारत म्हणजे दुर्दैवी राष्ट्र असा प्रचार सगळीकडे झाला होता. अशा कालखंडात टागोरांना नोबेल पारितोषिक मिळाले होते. आणि त्यामुळे सावरकरांना अत्यानंद झाला होता. आनंदाच्या भरात त्यांनी कोळसे भरताना कमरेला गुंडाळलेले चामड्याचे काळे 'सोंधणे' रुमालासारखे हवेत उडवले आणि कविता केली. त्या कवितेचा आशय असा आहे –

सावरकर म्हणतात की स्वातंत्र्यदेवता बाष्परथातून राजधानीकडे जिंकण्यासाठी निघाली आहे. मी तिला कवी म्हणून तिच्याबरोबर येऊ का विचारले तेव्हा ती म्हणाली तेथे रवींद्रनाथ असल्यामुळे तो कक्ष आता भरला आहे. मात्र कोळसे भरण्याच्या ठिकाणी रिकामी जागा आहे तेथे तू जा आणि कोळसे भर, म्हणजे रथ पुढे जाईल. कोळसे कमी पडले तर स्वत:ची हाडे तेथे घाल म्हणजे हा समररथ पुढे जाईल! पण आज या देशात दुंदुभी नगारे वाजताहेत. कारण आज कालिदास, भारवीसारखा महाकवी जन्माला आलाय! रवींद्रनाथ, तुमचे अभिनंदन! दुसऱ्या कडव्यात सावरकर म्हणतात, 'स्वातंत्र्याचा महायज्ञ सुरू आहे आणि तेथे दोन गुलाबाची फुले आली आहेत. एक फूल भारतमातेने आपल्या केसात माळले आणि दुसरे फूल यज्ञात आहुती म्हणून दिले. शेकडो भुंग्यांना आनंद देणारे ते वेणीत खोवलेले फूल म्हणजे, गुरुदेव, तुम्ही आहात आणि यज्ञात जळलेले दुसरे फूल मी आहे. त्या दुसऱ्या फुलाच्या धुरातून मी आपले अभिनंदन करतो.' सावरकरांची कविता अशी होती.

रामायण महाभारताप्रमाणेच सर्व पाश्चात्य महाकाव्यांचा अभ्यास त्यांनी केला. २४ भागातील 'पॅराडाईज लॉस्ट' त्यांनी अभ्यासिले होते. ते म्हणाले, ग्रीक, लॅटिन लोक हे जर महाकाव्य लिहितात तर आपण का नाही? आणि त्यांनी भाऊसाहेब पेशवे आणि पानिपताच्या लढ्यावर महाकाव्य लिहायला घेतले.

सावरकरांच्या ध्यानी, मनी, स्वप्नी फक्त या देशाचे स्वातंत्र्य! या देशाची समृद्धी, या देशातील लोकांची ऐहिक, पारलौकिक उन्नती! त्यांची एक कल्पना अशी आहे – एका सुंदर बागेचे वर्णन आहे. ते वाचून वाटते की हे सावरकर लिहिताहेत की बालकवी की कुसुमाग्रज की एखादा सौंदर्यवादी कवी? पण ती फुलबाग एका कमला नावाच्या आठ वर्षाच्या मुलीची आहे, आणि ती कविता म्हणजेच 'कमला' हे खंडकाव्य. पण तेथे दोन शेवग्याची झाडे आहेत आणि त्याच्या शेंगा त्यांना तलवारीसारख्या दिसत आहेत. सावरकर म्हणताहेत की सौंदर्याचे, पावित्र्याचे रक्षण करायचे असेल तर तुमच्या हातात शस्त्रच पाहिजे! तुमच्याकडे 'शास्त्र' होते पण हाती 'शस्त्र' नव्हते म्हणून तुम्हाला नालंदा, तक्षशीला जळताना पहावी लागली.

कमला ही लग्न झालेली मुलगी आहे आणि तिचा नवरा भाऊसाहेब पेशव्यांचा सैनिक आहे. त्याला युद्धावर जाण्याचा हुकुम झालेला आहे. सावरकर म्हणताहेत, या कमलेच्या पोटी कोणी भीष्म, कृष्ण, शंकराचार्य, गुरू गोविंदसिंग, छत्रपती शिवाजीमहाराज, रामदास स्वामी, तुकोबा जन्माला येतील. यासाठी क्रांतिकारकांनी लग्ने केली पाहिजेत!

कमला त्या बागेतील फुले तोडते तेव्हा त्यांचा चीक येतो तो तिला रक्तासारखा वाटतो. तेव्हा तिची सासू (जिचा सासरा आणि नवरा युद्धात कामी आलाय) तिला सांगते, 'अशी फुलेच काय, आपली मुलेही भारतमातेच्या चरणी अर्पण करायची असतात!' असे हे महाकाव्य, 'कमला'!

अशा हजारो ओळी सावरकरांनी भिंतीवर लिहिल्या. लोकांनी त्या पाठ करून बाहेर आणल्या. त्याचे पुस्तक छापले गेले. ते महाकाव्य रचताना त्यांनी त्यात एक अत्युच्च दर्जाची कविता लिहिली. ग.त्र्यं. माडखोलकर असं म्हणाले की ही एकच कविता त्यांनी लिहिली असती तरी ते अजरामर झाले असते! काय होते ते काव्य?

सावरकरांनी आपल्या भावाला लिहिलेल्या पत्रात आपली दिनचर्या लिहिली आहे. मी सकाळी सहा वाजल्यापासून दहा वाजेपर्यंत काबाडकष्ट करतो. १० ते १२ या जेवणाच्या वेळेत आज रात्री काय लिहायचे याचे चिंतन मी करतो. १२ ते ४ पुन्हा कष्ट आणि सहा

वाजता कोठडीत कोंबणार, अशी ती दिनचर्या! माझ्या शरीरावर इंग्रजांची सत्ता आहे म्हणून ते मला कोंडून ठेवतात. पण माझ्या स्वप्नांवर तर त्यांची बंधने नाहीत! माझा प्राणपक्षी उडून भारतमातेकडे जातो आणि देशबांधवांची दुःखे निवारण करून पुन्हा या कोठडीत परततो.

सावरकरांनी जगन्नाथपुरीची रथयात्रा बघितलेली नाही. परंतु ३२ पौंड तेल गाळताना त्यांच्या डोळ्यासमोर जगन्नाथाची रथयात्रा दिसली आणि त्यांना वाटले जगन्नियंत्याचे वर्णन करावे! आंधळ्यांना जसा हत्ती दिसावा तसा परमेश्वर प्रत्येकाला वेगळा दिसतो, वाटतो. सावरकर उंच आकाशात, सप्तर्षींच्या पलीकडे गेलेत. आणि तेथून ते आकाशातून चाललेल्या मिरवणुकीचे वर्णन केवळ चार कडव्यात करताहेत. 'जगन्नाथाचा रथोत्सव'! – 'ऐश्वर्ये भारी । या अशा । ऐश्वर्ये भारी। महाराज आपुली कथा ना, कुठे निघे स्वारी?....रथ कसा आहे? 'दिक्क्षितिजांचा दैदीप्य रथ तुझा सुटता । या कालपथाच्या अतुट उतरणीवरता । नक्षत्रकणांचा उडे धुरोळा वरता । युगक्रोश दुरी । मागुती । युगक्रोश दुरी । पुसूं नयेचि परी । पुसतसे । पुसूं नयेचि परी । मिरवणूक ही किमर्थ अथवा कुठे निघे ही स्वारी । दुज्या कुण्या द्वारीं । जावया । दुज्या कुण्या द्वारीं ।'

रामदास म्हणतात 'जाणारासी पुसू नये । कोठे जातो म्हणू नये । पण तरीही विचारतो की आपण दुसऱ्या कोणाकडे चालला आहात का? जगन्नाथाचा रथ आपल्या मावशीच्या घरी जाऊन दूध-पोहे खाऊन येतो. तसे आपण कोठे जात आहात का? 'किंवा केवळ मिरवित येई परत निजागारीं । ह्या सूर्यशतांच्या किती मशाली जळती । मधुनिच शतावधि चंद्रज्योति ह्या अडति । सरसरत बाण हे धुमकेतूचे सुटती । कितिदां आणि तरी । हीही तैं । कितिदां आणि तरी । उठे चमकुनि रात्रि पुरातन तिच्या अंधकारी ।'

ही मिरवणूक रात्री निघाली आहे. सावरकर म्हणतात, ही काळरात्र, महारात्र, अहोरात्र आहे. ही योगवसिष्टातील कल्पना आहे. सावरकरांनी योगवसिष्ट, रामदास तसेच संतसाहित्याचा अभ्यास केला होता. या कवितेत ते अध्यात्म प्रकट करत आहेत. 'जीवाचीच किती । कथा ह्या । जीवाचीच किती । रथासि जगन्नाथ, तुझ्या ह्यां ओढूं जे झटती। ज्वालामुखिपंक्ती – । पासुनि । ज्वालामुखिपंक्ती ।'... जगन्नाथाचा रथ लाखो लोक ओढतात. तुझा रथ ज्वालामुखीतील ऊर्जा ओढत आहे.

आणि शेवटचे कडवे म्हणजे शुद्ध वेदांतच आहे. 'इच्छांत आणि ह्या भूतमात्र वेगांच्या । ओंवून लगामा तुझ्या परम इच्छेचा ।' ...घोडे परम वेगाने सुटले आहेत. पण तुझ्या रथाला सारथी नाही. घोड्यांना लगाम नाही. त्यांची गती तुझ्या इच्छेने तूच ठरवतो आहेस. काळ किती गतीने पुढे जावा हे तूच ठरवतोस आणि त्या काळाला चिरडून चिरंजीव कोण होणार हेही तूच ठरवतोस! 'खेळत हा अतली । रथोत्सव । खेळत हा अतली ।' .... अतली म्हणजे ज्याचा थांग लागत नाही, तळ लागत नाही असा तू! काय खेळ मांडला आहेस? जेव्हापासून माणूस विचार करू लागला तेव्हापासून प्रत्येक धर्मातील, प्रत्येक देशातील, प्रत्येक भाषेतील, प्रत्येक माणसाला पडलेले सर्व प्रश्न सावरकरांनी या एका कवितेत मांडले आहेत. ती ही कविता – 'जगन्नाथचा रथ'! माणसं कशाला जन्माला घालताय आणि कशाला मारताय? कशाला देश घडवताय आणि कशाला मोडताय? किती दिवस हे चालणार आहे? सावरकर प्रश्न विचारताहेत, पण जगन्नाथ काही उत्तर देत नाहीत. प्रत्येक जिज्ञासू माणूस, 'परमेश्वर म्हणजे काय? मृत्यू म्हणजे काय? मृत्यूनंतर काय' याचे चिंतन करीत असतो. कुणी केले नसेल असे चिंतन सावरकरांनी अंदमानच्या भिंतीवर लिहिले. एक कवी म्हणतो, 'अंदमानतल्या भिंती गाती । कविताच माझ्या अंगावरती खेळत होती ।'

अंदमानात सावरकरांचे एवढे हाल केले गेले की सावरकर आजारी पडले. मृत्यू पुन्हा एकदा भेटायला आला. दोन वर्षे सावरकर केवळ चमचाभर कांजीवर जगत होते. त्या वेळी सावरकरांनी तुरुंगातील शेवटचे काव्य केले, 'मरणोन्मुख शय्येवर!' 'ये मृत्यो! ये तू ये, यावयाप्रती । निघालाचि असशिल जरी ये तरी सुखें । कोमेजुनि जावया भिवोत हीं फुलें । हीं द्राक्षें रसरशीत सुकुनि जावया । भ्यावें तें कां म्हणुनी तुजसि परी मी? ।' ..... द्राक्षे, फुले ताजी आहेत, पण माझ्या अंगातील चेतनेचा कण अन् कण आता संपून गेलाय. सावरकरांच्या दृष्टीने मरणाचे भय कोणाला? जो रिकामा बसलाय, उचापत्या करतोय, आळसात लोळतोय, त्याला. 'म्यां असता दिवस नसे व्यर्थ गमविला ।'... आणि शेवटी मृत्यू म्हणजे काय आहे? एक तिकीट (सावरकरांच्या भाषेत म्हणजे – दर्शिका)! माणूस मृत्यूला का घाबरतो? कारण पुढचा प्रवास अज्ञात आहे. पुढे काय भेटेल, कोण भेटेल माहीत नाही. पण मी मृत्यूला घाबरत नाही कारण 'म्यां असता दिवस नसे व्यर्थ गमविला ।'..... आणि माझे कर्तृत्व बघून स्वये श्रीकृष्णाने आम्हाला या संबंधातील एक पत्र दिलेले आहे. आणि त्यामुळे मोक्ष तर मला मिळणारच आहे. या वेळीही मृत्यूच सावरकरांना भ्याला!

सत्तर हजार लोकांनी सावरकरांची सुटका करा म्हणून निवेदन दिले. जोपर्यंत टिळक हयात होते तोपर्यंत सरकारने सावरकरांना सोडले नाही. टिळकांच्या मृत्यूनंतर सावरकरांची सुटका केली कारण हे दोघे जण एकत्र आले तर वर्षाभरातच सरकार उलथून टाकतील अशी सरकारला भिती होती. मूर्ख, नालायक आणि खुळचट लोक सावरकर माफी मागून सुटले असे म्हणतात. अंदमानातून भारतात आणल्यावरही सावरकरांना विजापूर, अलिपूर, येरवडा आणि रत्नागिरी येथे तुरुंगातच ठेवलेले होते. शिक्षेचा कालावधी कमी केलेला नाही. रत्नागिरीला असताना तर त्यांच्या मनात आत्महत्येचेही विचार आले होते, एवढ्या हालअपेष्टा त्यांना सोसाव्या लागल्या. सावरकरांनी विवेकानंदांचे बंधू भुपेंद्रनाथ दत्त आणि अन्य दोन क्रांतिकारकांसाठी पत्रे दिली आणि ते सुटले. बाहेर आल्यावर त्यांनी पुन्हा क्रांतिकार्याला सुरुवात केली. पण इंग्रज सरकारने भारतात चार वर्षे सावरकरांचे हालच केले आणि मग २४ साली त्यांना दोन अटीवर सोडले. पहिली अट रत्नागिरीबाहेर जायचे नाही आणि दुसरी अट म्हणजे हिंसक कार्यात भाग घ्यायचा नाही. हे मान्य करण्यात काय अडचण होती?

सावरकरांचे गुरू काळकर्ते परांजपे, त्यांचे गुरू लो. टिळक, म्हणून सावरकर टिळकांना 'परात्पर गुरू' म्हणत! या टिळकांकडे सी. डी. देशमूख स्वातंत्र्यलढ्यात सामील होण्यासाठी परवानगी मागायला गेले होते. टिळकांनी त्यांना सांगितले की ब्रिटिश देश सोडून गेले की आपणाला देश चालवायचा आहे. तुझ्यासारख्या अर्थशास्त्रज्ञाने सरकारी नोकरीत शिरून अनुभव घेतला पाहिजे. त्याचा स्वातंत्र्यात देशाला उपयोग होईल. ते देशमुख पुढे रिझर्व बॅन्केचे पहिले भारतीय गव्हर्नर झाले. सावरकर अंदमानात कैद्यांसाठी वाचनालय चालवीत. त्यामध्ये सर्व भाषातील पुस्तके होती. स्वातंत्र्यानंतर देशाला ज्ञानवंत माणसांची गरज आहे असा त्यामागे विचार होता. असे सावरकर रत्नागिरीत आल्यावर अखंड हिंदू समाजाचे ऐक्य करू लागले. हिंदूधर्मातील रोटीबंदी, बेटीबंदी, स्पर्शबंदी, सिंधूबंदी, व्यवसायबंदी आदी सात वैगुण्यांची नोंद घेतली. रत्नागिरीला आल्यावर जराही विश्रांती न घेता त्यांनी आपल्या कामाला सुरुवात केली. सात जानेवारीला ते रत्नागिरीला आले, १४ तारखेला मकरसंक्रांत. त्या दिवशी सावरकर सोबत शिवा भंगी यांना घेऊन लोकांच्या घरी तिळगूळ द्यायला गेले. आजही अनेक माणसांना जे जमत नाही ते सावरकरांनी त्या वेळी म्हणजे १९२४ सालीच केले. घरात कामासाठी अस्पृश्य समजलेल्या समाजातील माणसाला ठेवले. रत्नागिरी जिल्ह्यातील शेकडो शाळात सगळ्या जातीजमातीची मुले एकत्र बसविली. सगळ्यांना मंदिर प्रवेश दिला. रत्नागिरीत पतितपावन मंदिर बांधून वेदोक्त पद्धतीने भागोजी किर नावाच्या भंडारी समाजाच्या गृहस्थांच्या हस्ते प्राणप्रतिष्ठा केली. हे अन्य कोणालाही जमलेले नाही.

'तुम्ही आम्ही सकलही बंधू बंधू । तो महादेवही पिता आपुला चला तया वंदू । तो ब्राह्मण वा क्षत्रिय चांग जरी झाला । कसलेही रूप वा रंग जरी त्याला । तो महार अथवा मांग सकलांला । ही एकचि आई हिंदुजाति आम्हांस तिला वंदू ।' अशा तऱ्हेने सावरकरांनी रत्नागिरीत अद्वितीय काम केले. त्या वेळी इंग्रज सरकारने काही मंत्रिमंडळे स्थापन केली होती. त्यात एक जमनादास मेहता नावाचे मंत्री होत. त्यांच्या आग्रहाखातर सावरकरांना १९३७ साली सोडावे लागले. त्या वेळी मुस्लिम लीगने फाळणीची मागणी केली. सावरकर म्हणाले की आम्ही यासाठी का तुरुंगवास सहन केला, हालअपेष्टा भोगल्या? आम्हाला अखड हिंदुस्थान हवे. मुस्लिमांना हिंदूंच्या बरोबरीने अधिकार मिळतील! मात्र अन्य नेतृत्वाने फाळणी स्वीकारली. सावरकर देशभर अखंड हिंदुस्थानासाठी जागृती करीत फिरले. पण फाळणी झालीच. सावरकरांनी १५ ऑगस्टला आपल्या घरावर भगवा ध्वजही लावला आणि तिरंगा ध्वज लावला.

मग सावरकरांनी हिंदू समाजाच्या जागृतीसाठी 'सहा सोनेरी पाने' हा अजरामर ग्रंथ लिहिला. त्यासाठी त्यांना १५-१६ वर्षे लागली. 'माझी जन्मठेप' आणि 'सहा सोनेरी पाने' हे ग्रंथ वाचलेत तर अन्य काही वाचायची गरज नाही. दासबोध, ज्ञानेश्वरीसारखे जर ' माझी जन्मठेप'चे पारायण केलेत तर जीवनात कधीही तुम्हाला नैराश्य येणार नाही. 'सहा सोनेरी पाने' या ग्रंथात त्यांनी हिंदू समाजातील दोष दाखवले आहेत. आत्यंतिक चांगुलपणा हा दोष आहे असे प्रतिपादन त्यांनी केले आहे.

'सागरा प्राण तळमळला' ही कविता लिहिताना सावरकर रडले. भारताची फाळणी झाली तेव्हा एकदा रडले. १९६२ साली चीनने भारतावर आक्रमण केले तेव्हा एकदा सावरकर रडले. युद्ध लढून पराभव झाला असता तरी हरकत नव्हती पण आपल्या नेभळ्या दुबळ्या नेतृत्वामुळे, हिमालयात लढणाऱ्या सैनिकांना, पायात बूटसुद्धा नाहीत, अशा अवस्थेत लढावे लागले, म्हणून सावरकर रडले. मग शास्त्रीजींचे राज्य आले. पाकिस्तानने पुन्हा एकदा हल्ला केला. सावरकर म्हणाले, नेहरूंना अठरा वर्षात जे जमले नाही ते शास्त्रींनी अठरा महिन्यात केले. पाकिस्तानचा पराभव झाला. माझ्या सगळ्या इच्छा पूर्ण झाल्या.

भाषाशुद्धीसाठी सावरकरांनी डायरेक्टर - दिग्दर्शक, मेयर - महापौर, असे २६७ प्रतिशब्द तयार केले. सावरकरांनी केलेली 'हिंदू'ची व्याख्या मान्य करून सरकारने ती हिंदू कोड बिलात अंतर्भूत केली. सावरकर म्हणाले आता मला जगण्यासारखे काही राहिलेले नाही. २३ फेब्रुवारीपासून सावरकरांनी अन्नपाणी सोडले. प्रभात या त्यांच्या लाडक्या मुलीच्या आग्रहाखातर एकदाच त्यांनी चहा घेतला, त्यातून तिने काही औषध देण्याचा प्रयत्न केला. मग तिच्या हातचेही काही घेण्यास त्यांनी नकार दिला. सावरकरांनी प्रायोपवेशन सुरू केलं आणि आजपासून छप्पन वर्षांपूर्वी सावरकरांनी याच वेळी आपला देह ठेवला.''

वंदेमातरम् राष्ट्रगीत गायनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## दासनवमी आणि पाठांतर स्पर्धा पारितोषिक वितरण समारंभ




*मनाचे श्लोक, करुणाष्टके, आदीचे पठण*




*पारितोषिक वितरण*

शिवसमर्थ गड, श्री क्षेत्र डेरवण येथे प्रतिवर्षाप्रमाणे दासनवमीच्या दिवशी, शुक्रवार दि. २५ फेब्रुवारी २०२२ रोजी दुपारी तीन वाजता, पाठांतर स्पर्धेचा पारितोषिक समारंभ साजरा झाला. समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून श्री. उदयन् आचार्य (डोंबिवली) हे उपस्थित होते. शान्तिसूक्त पठणाने कार्यक्रमाला सुरुवात झाली. प्रमुख पाहुण्यांनी श्रीसमर्थ रामदास स्वामींच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलन केल्यावर सौ. वैदेही जोशी यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला.

श्री. उदयन् आचार्य वाणिज्य पदवीधर असून त्यांनी काही वर्षे अकाउंटंट म्हणून एका कंपनीत नोकरी केली. गायनाचेही धडे त्यांनी आपल्या मातोश्री, भगिनी आणि गुरू यांच्याकडून घेतले आहेत. प.पू. कलावतीआई(बेळगाव) यांचे ते अनुग्रहित शिष्य असून अविवाहित राहून ते परमार्थसाधना करतात. त्यांनी नर्मदेची यथासांग परिक्रमा तीन वेळा( प्रत्येकी १०८ दिवसात) केली आहे. या परिक्रमेतील अनुभव सांगणारे नर्मदा परिक्रमा : एक आनंदयात्रा हे पुस्तकही त्यांनी लिहिले आहेत. सप्तमातृका मंदिर, महेश्वर येथे वर्षातून काही दिवस राहून ते परिक्रमावासियांची सेवा करतात. अनेक ठिकाणी त्यांनी आपले परिक्रमेतील अनुभव कथन केले आहेत.

प्रमुख पाहुण्यांचा सौ. शरयू यशवंतराव, शिक्षण संचालिका, यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आदी देऊन सत्कार करण्यात आल्यावर आपल्या प्रास्ताविक भाषणात सौ. यशवंतराव म्हणाल्या, ''१९६८ सालापासून अव्याहत हा कार्यक्रम सुरू आहे. श्रीसमर्थांनी 'कोमल वाचा दे रे राम । विमल करणी दे रे राम।' याच बरोबर 'बहुत पाठांतर दे रे राम।' असे ही सांगितले आहे. बालवयातच सहजपणे पाठांतर होते. म्हणून मुलांसाठी हा उपक्रम श्रीसहजानंद महाराजांनी सुरू केला आहे.'' गत ५४ वर्षात स्पर्धेच्या उत्क्रांत होत गेलेल्या स्वरूपाचा आढावा घेऊन सौ. यशवंतराव म्हणाल्या की आता माजी विद्यार्थी भेटले की आवर्जून सांगतात की त्यावेळी आम्हाला पाठ करताना नेमका अर्थ समजत नव्हता, पण आज त्याचा अर्थही कळतो आणि जीवनात त्याचा उपयोगही होतो. पाठांतराने वाणी सुधारते, उच्चार सुधारतात, सभाधीटपणा येतो म्हणून मुलांनी अधिकाधिक संख्येने या स्पर्धेत भाग घेतला पाहिजे.

श्रीमती गीतांजली परब यांनी यानंतर मुलांना एक बोधकथा सांगितली. ज्ञान आणि शक्ती या दोन्हीची माणसाला आवश्यकता असते. या




*श्री. उदयन् आचार्य मुलांशी संवाद साधताना*



*सामुहिक स्तोत्रपठण*

दोन्ही गोष्टी याने प्राप्त करून घेतल्या पाहिजेत असा त्या बोधकथेचा आशय होता. या बोधकथेनंतर मुलांनी अभंग, श्रीस्वामी समर्थ नमस्कार, मनाचे श्लोक, करुणाष्टके, श्रीनृसिंहपंचक स्तोत्र आदीचे पठण केले आणि पाहुण्यांच्या हस्ते बक्षिसवितरण करण्यात आले. समारंभाच्या अखेरीस अत्यंत सुरेलपणे काही श्लोकांचे गायन करून आणि त्यात बाळगोपाळांना सामील करून घेऊन सुरू केलेल्या आपल्या भाषणात श्री. आचार्य यांनी सांगितले,''मना सज्जना भक्तिपंथेची जावे।' याचा अर्थ कामधाम सोडून टाळ वाजवीत भजन करीत बसायचे असा नसून आपण जे काम करतो ते काम म्हणजेच देवाची, समाजाची आणि देशाची सेवाच आहे अशा भावनेने ते करावे म्हणजे परमेश्वर प्रसन्न होतो. डॉक्टर रुग्णसेवा करतात, तीच त्यांची भक्ती! डॉक्टरांनी इंजेक्शन दिले तर दुखते. पण त्यामुळे आपण बरे होतो. डॉक्टरांचे काम हीच त्यांची भक्ती! आपल्या वाट्याला आलेले काम मनापासून करणे म्हणजे भक्ती!

''हे मनाचे श्लोक, या प्रार्थना कशासाठी म्हणायच्या? बक्षीस मिळवण्यासाठी ? हो! त्या साठी तर म्हणायचेच! पण त्याहीपेक्षा वर जो बसला आहे, तो कृष्ण, तो गणपती जो आहे, त्याच्याकडून बक्षीस मिळविण्यासाठी ! गणपती स्वत: साक्षात येऊन बक्षीस देण्याएवढी पात्रता मिळविण्यासाठी तर प्रार्थना आवश्यक आहेच. पण दिगंबरदास महाराज किंवा आत्ताचे श्री काकामहाराज हे ही देवाचेच रूप आहेत आणि त्यांच्याकडून मिळालेले बक्षीस म्हणजे देवाकडून मिळालेलेच बक्षीस आहे. येथे हे एवढे जे कार्य सुरू आहे ते त्यांच्याच आशीर्वादाने निर्माण झाले आहे.''

माणसाने वागताना तारतम्याने वागले पाहिजे अन्यथा लोकात त्याचे हसे होते या विषयी एक गमतीदार गोष्ट मुलांना सांगून मुलांनी प्रार्थनांचे पाठांतर केल्यामुळे आज त्यांचे कौतुक होत आहे हे मुलांच्या लक्षात आणून दिले. प्रार्थनेमुळे मन शुद्ध होते आणि ज्याचे मन शुद्ध असते त्याला परमेश्वर सहजपणे साहाय्यभूत होतो, त्याचा पाठीराखा होतो असे सांगून जंगलातून एकटा शाळेत जाणाऱ्या गोविंदा नावाच्या मुलाच्या सोबतीला रोज ईश्वर कसा छोट्या बासरी वाजवणाऱ्या मुलाच्या रूपात येत असे ही गोष्ट अतिशय रंजक पद्धतीने मुलांना सांगितली.

गोष्टीच्या ओघात श्रीकाकांविषयी एक आठवण त्यांनी सांगितली. श्रीकाकांना यापूर्वी एकदाच ते भेटायला गेले होते. त्या वेळी सोबत

ते अर्पण करायला म्हणून काही केळी घेऊन गेले होते. श्रीकाकांच्या आज्ञेवरून त्यांनी एक अभंग तेव्हा म्हटला होता, 'नीज बोधाची दिवटी लावी। देव प्रत्यक्ष नयनी दावी । या गुरूसी काय बा द्यावे । यासी कैसे मी उतराई व्हावे ।।' तेव्हा श्रीकाका त्यांना म्हणाले की गुरूंना काही अर्पण करावे असे कोणाला तीव्रतेने वाटत असेल तर त्याने आपली उपासना सद्गुरूंना अर्पण करावी, बाकी काही नको!

''आई, वडील, सद्गुरू यांनी सांगितलेल्या गोष्टींवर विश्वास ठेवला, आचरणात आणले तर परमेश्वर सुद्धा आपणाला भेटतो, संकटात सोबत करतो. म्हणून मनाचे श्लोक, रामरक्षा, मारुती स्तोत्र म्हणायचे. मारुती सोबत आला तर तुम्हाला भीती वाटेल का? म्हणून मारुतीच्या समोर बसून स्तोत्र म्हणा! पण मारुती ते ऐकतोय असे आपणाला वाटते का? तसे ते वाटले पाहिजे!'' अशा शब्दात मुलांशी साधलेल्या संवादाची अखेर त्यांनी मुलांसह मारुतीस्तोत्रपठण करून केली. सौ. वैदेही जोशी यांनी आभार प्रदर्शन केल्यावर वरयाचना पठणाने कार्यक्रमाची सांगता झाली. सौ. पल्लवी तेंडुलकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

## वालावलकर रुग्णालयात इंटरव्हेन्शनल रेडिऑलॉजी शस्त्रक्रिया सेवा उपलब्ध

वालावलकर रुग्णालयात दि. २९ जानेवारी ते १४ फेब्रुवारी २०२२ या कालावधीत विविध प्रकारच्या इंटरव्हेन्शनल रेडिऑलॉजी शस्त्रक्रिया करण्यात आल्या. इंटरव्हेन्शनल रेडिऑलॉजी शस्त्रक्रियेमध्ये बहुतेक वेळा रक्तवाहिनीमध्ये सुई घालून, त्या सुईमधुन कॅथेटर घालून शरीराच्या ज्या भागात आजार आहे तेथे उपचार केले जातात. या पद्धतीचा फायदा म्हणजे रुग्णाला संपूर्ण भूल द्यावी लागत नाही. शस्त्रक्रियेचा खर्चही कमी होतो आणि रुग्णाला कमीतकमी वेळ रुग्णालयात राहावे लागते. अशा प्रकारची उपचार पद्धती वालावलकर रुग्णालयात सर्रास वापरली जाते. दि. २९ जानेवारी रोजी डॉ. अमीत साहू ( इंटरव्हेन्शनल रेडिऑलॉजीस्ट, फोर्टिस हॉस्पिटल, मुंबई) यांनी रुग्णालयाला भेट दिली. त्या दिवशी त्यांनी, ज्यांचे मुत्रपिंड निकामी झाले आहेत अशा दोन रुग्णांवर उपचार केले. या रुग्णांना सातत्याने डायलिसीस करावे लागत असल्यामुळे, त्यांना परमाकॅथेटर बसविले. परमाकॅथेटरमुळे डायलिसीस करणे सोपे जाते. त्यांनी दोन रुग्णांच्या पायावरील व्हेरिकोज व्हेन्सवरती लेसर उपचार केले. व्हेरिकोज व्हेन्स झालेल्या रुग्णाच्या पायावरील शिरांच्या झडपा खराब झालेल्या असतात. त्यामुळे त्या सूज येऊन, फुगून काळसर निळ्या होतात आणि जखमाही होतात. अशा रुग्णांवरती आता रुग्णालयात लेसरद्वारा यशस्वीपणे उपचार केले जातात.

दि. ९ फेब्रुवारी रोजी डॉ. अमीत साहू यांनी रुग्णालयात पाच इंटरव्हेन्शनल प्रोसिजर्स केल्या. एका रुग्णाच्या पायाची अँजिओग्राफी आणि अँजिओप्लास्टी केली. त्या रुग्णाच्या पायाला जखम(अल्सर) झालेली होती. पायाच्या सी.टी, अँजिओग्राफीमध्ये असे आढळले की त्याच्या पायाच्या रक्तवाहिनीमध्ये गुठळी झालेली होती आणि त्यामुळे जखम झाली. अँजिओग्राफी आणि अँजिओप्लास्टी करून त्या रक्तवाहिनीत स्टेंट बसवून रक्तपुरवठा सुरळीत करण्यात आला आणि त्यामुळे जखम बरी झाली.

दुसऱ्या एका रुग्णाला लिव्हर सिरोसिस झालेले होते. त्यामुळे त्याच्या यकृत, प्लिहा आणि जठर यांच्या बाजूच्या रक्तवाहिन्यांना सूज आली होती. त्यामुळे रुग्णाच्या आतड्यात रक्तस्राव होऊन शौचावाटे रक्त पडत होते. हा रुग्ण डॉ. आनंद जोशी (गॅस्ट्रोएन्टेरॉलॉजिस्ट) यांनी तपासून डॉ. साहू यांच्याकडे पार्टो प्रोसिजरसाठी पाठविला. पार्टो प्रोसिजरमध्ये जठर, प्लिहा यांच्या बाजूच्या फुगलेल्या शिरा एक प्रकारचे औषध देऊन बंद केल्या जातात. जांघेतून रक्तवाहिनीमध्ये सुई घातली जाते. त्यातून कॅथेटर घालून तो सुजलेल्या शिरांपर्यंत नेला जातो आणि इंजक्शन देऊन त्या बंद केल्या जातात. त्यामुळे शौचावाटे होणारा रक्तस्राव थांबतो. अशा प्रकारची अत्याधुनिक शस्त्रक्रिया कोकणात प्रथमच करण्यात आली. एका रुग्णाच्या पायावर  अल्सर/गँगरिन झालेले होते. त्या रुग्णावर लोअर लिंब ॲन्जिओग्राफी आणि स्टेंटिंग





प्लास्टी करण्यात आली. शिवाय त्याच दिवशी दोन रुग्णांवर व्हेरिकोज व्हेन्सवरती लेसर उपचार करण्यात आले.

दि. १३ फेब्रुवारी रोजी टाटा हॉस्पिटल, मुंबई येथून डॉ. फैजल सय्यद आणि डॉ. फाल्गुनी होटा या दोन इंटरव्हेन्शनल रेडिऑलॉजीस्टनी रुग्णालयाला भेट दिली. त्यांनी तीन इंटरव्हेन्शनल प्रोसिजर्स केल्या. एका स्त्री रुग्णाला पित्त नलिकेचा कॅन्सर झाल्यामुळे कावीळ झाली होती आणि यकृतात पित्त साठलेले होते. या रुग्णावर पीटीबीडी आणि दोन मेटल स्टेन्ट घालण्यात आले. त्यामुळे पित्तनलिका व्यवस्थित मोकळी होऊन पित्त लहान आतड्यात व्यवस्थितरीत्या जाऊ लागले. रुग्णावरती पुढील केमोथेरपी उपचार सुरू झाले आहेत. दोन रुग्णाच्या पायावर गँगरिन झालेले होते. त्या रुग्णांवर लोअर लिंब ॲन्जिओग्राफी करण्यात आली. एका रुग्णावर बलून अँजिओप्लास्टी करण्यात आली.

वालावलकर रुग्णालयात आता सातत्याने हे आधुनिक उपचार उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

## डॉ. नरेंद्र चिरमुले (हेड, रिसर्च अँड डेव्हलपमेंट–बीओकॉन लिमिटेड) यांची रुग्णालयाला भेट



*डावीकडून – डॉ. नाडकर्णी, डॉ. चिरमुले. डॉ. पाटील आणि डॉ. ऋता मुल्हेरकर*



*डॉ. चिरमुले वैद्यकीय विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना संबोधताना*



*डॉ. चिरमुले वैद्यकीय विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना संबोधताना*

डॉ. नरेंद्र चिरमुले (हेड रिसर्च अँड डेव्हलपमेंट – बीओकॉन लिमिटेड) न्यूयॉर्क आणि पेनसिल्व्हेनिया, यांनी शुक्रवारी दि. ११ फेब्रुवारी २०२२ रोजी सकाळी भ.क.ल. वालावलकर रुग्णालयाला आणि ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयाला भेट दिली. यावेळी त्यांनी औषध निर्माण शास्त्र व एच. आय. व्ही. (HIV) लसीकरण या विषयावर वैद्यकीय विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना व्याख्यान दिले.

# वालावलकर रुग्णालयात जनरल प्रॅक्टिशनर्ससाठी कार्यशाळा संपन्न




*कार्यशाळेत सहभागी डॉक्टर्स*

गेल्या पावसाळ्यात चिपळूण भागात अभूतपूर्व असा पूर आला होता. त्यावेळी त्या भागात डॉ. संजय वाणी, डॉ. जस्मिन वाणी व डॉ. शुभा राऊळ (मुंबईच्या माजी महापौर)आदींचे पथक आरोग्य सेवा देण्यासाठी आले होते आणि त्या वेळी त्यांनी वालावलकर रुग्णालयाला भेट दिली होती आणि रुग्णालयाची सगळी माहिती जाणून घेतली होती. त्या वेळी झालेल्या चर्चेमध्ये असे ठरले होते की, मुंबईच्या जनरल प्रॅक्टिशनर्सना उपयुक्त ठरेल अशी एक कार्यशाळा येथे घ्यावी. डॉ. संजय वाणी आणि डॉ. शुभा राऊळ यांच्या पुढाकाराने आणि सहकार्याने ही कार्यशाळा नुकतीच उत्तमरीत्या पार पडली.

विविध आरोग्य विषयांवरती ही कार्यशाळा वालावलकर रुग्णालयात दि. ४, ५ व ६ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर कार्यशाळेमध्ये मुंबईच्या १७ जनरल प्रॅक्टिशनर्सनी  भाग घेतला होता.  सदर कार्यशाळेमध्ये जनरल प्रॅक्टिशनर्सना त्यांच्या दररोजच्या जनरल प्रॅक्टिसमध्ये आढळणाऱ्या आजारांविषयी माहिती, तसेच त्याच्यावर जनरल प्रॅक्टिस लेव्हलच्या उपचार पद्धती शिकवण्यात आल्या.

कार्यशाळेमध्ये पहिल्या दिवशी (दि. ४ फेब्रुवारी) पहिल्या सत्रात 'कार्डियाक इमर्जन्सी' विषयी डॉ. प्रणव शामराज (कार्डीऑलॉजिस्ट) यांनी माहिती दिली. डॉ. अमोल धर्माधिकारी (कार्डिॲक सर्जन) यांनी हृदयरोग व त्यावरील शस्त्रक्रिया व यामध्ये जनरल प्रॅक्टिशनरने पेशंटची घ्यावयाची काळजी याविषयी माहिती दिली. डॉ. अस्मिता कर्नाळकर (अनेस्थेटिस्ट) यांनी इमर्जन्सी औषधांचा वापर कसा करावा याविषयी माहिती दिली. दुपारच्या सत्रात डॉ. मंदार अक्कलकोटकर (बी.एल.एस., ट्रेनर, पुणे) यांनी सर्व सहभागी डॉक्टरांना बेसिक लाईफ सपोर्टचे ट्रेनिंग विविध मॅनिकीन्स वरती दिले. संध्याकाळी सर्व सहभागी डॉक्टर्सनी स्पोर्ट कॉम्प्लेक्सला भेट दिली व खेळाचा आनंद घेतला.

दुसऱ्या दिवशी  (दि. ५ फेब्रुवारी) डॉ. प्राची झिंगे, डॉ. आसावरी मोडक, डॉ. सुवर्णा पाटील यांनी सर्व सहभागी डॉक्टर्सना विविध आरोग्य-योजना, महात्मा फुले जन आरोग्य योजना, कुरकुरे योजना, आय. सी. एस. योजना, वालावलकर योजना इत्यादी योजनांविषयी माहिती दिली. या योजनांमधून वालावलकर रुग्णालयात गरजू रुग्णांवर मोफत उपचार कसे होतात ते विशद केले. तसेच वालावलकर रुग्णालयात पुणे, मुंबई यासारख्या मोठ्या शहरातील हॉस्पिटलमधील खर्चापेक्षा निम्म्या खर्चात उपचार होतात, असे डॉ. सुवर्णा पाटील यांनी सर्व डॉक्टर्सना सांगितले. त्यानंतर डॉ. प्रदीप कुलकर्णी (रेडिओलॉजिस्ट ) यांनी चेस्ट-एक्सरे विषयी माहिती दिली. डॉ. नेताजी पाटील (रेडिओलॉजिस्ट) यांनी सी.टी. स्कॅन  व एम.आर. आय. कधी करायचा याविषयी माहिती दिली. डॉ. प्रसन्ना नकाते (मायक्रोबियॉलॉजिस्ट) यांनी जनरल प्रॅक्टिसमध्ये उपकरणांचे



बेसिक लाईफ सपोर्टचे ट्रेनिंग - डॉ. मंदार अक्कलकोटकर



'बेसिक सर्जिकल कोर्स'ची प्रात्यक्षिके

निर्जंतुकिकरण कसे करावे याविषयी माहिती दिली. डॉ. आनंद जोशी (गॅस्ट्रोइन्ट्रलॉजिस्ट ) यांनी अन्न नलिका, जठर, लहान व मोठे आतडे यांचे आजार व त्यांचा दुर्बिणीद्वारे करण्यात येणारा तपास व उपचार या विषयी माहिती दिली.

दुसऱ्या दिवशीच्या दुपारच्या सत्रात डॉ. संजीव पाटणकर (सर्जन) व डॉ. भारती शर्मा (ऑर्थोपेडिक सर्जन्स) यांनी जॉनसन्स अँड जॉनसन्स कंपनीच्या साहाय्यने 'बेसिक सर्जिकल कोर्स'ची प्रात्यक्षिके विविध मॉडेल्स व मॅनिकीन्स यांच्या साहाय्याने शिकवली. संध्याकाळी सर्व जनरल प्रॅक्टिशनरनी संपूर्ण हॉस्पिटलचा राऊंड घेतला.

तिसऱ्या दिवशी (दि. ६ फेब्रुवारी) सकाळच्या सत्रात डॉ. सुनील नाडकर्णी (सर्जन, पुणे) यांनी वालावलकर रुग्णालयातील जी. एम. पी. लॅब व तिच्यात चालू असलेल्याला संशोधनाविषयी माहिती दिली. डॉ. सतीश गोरे (स्पाईन सर्जन, पुणे) यांनी पाठदुखी आजाराचे निदान व त्यावरील विविध प्रकारच्या उपचार पद्धती याविषयी माहिती दिली. डॉ. बोबडे (स्किन स्पेशालिस्ट) यांनी विविध त्वचारोग, त्यांचे निदान व उपचार याविषयी माहिती दिली. डॉ. वैष्णवी पाटील (नेत्ररोगतज्ज्ञ) यांनी डोळ्यांच्या विविध आजारांची व उपचारांविषयी माहिती दिली. डॉ. सुवर्णा पाटील (फिजीशीयन) यांनी रक्तदाब व मधुमेह या आजारांविषयी व त्यांच्या उपचार पद्धतीविषयी माहिती दिली.

तिसऱ्या दिवशीच्या दुपारच्या सत्रात डॉ. भारती शर्मा (ऑर्थोपेडिक सर्जन) यांनी अपघातग्रस्त रुग्णांवर करण्यात येणारे प्रथमोपचार व फ्रॅक्चरसाठी लावण्यात येणारे विविध स्प्लिन्ट याविषयी माहिती दिली. डॉ. विनोद चौधरी (पेडियाट्रिशन)यांनी लहान मुलांचे आजार व उपचार या विषयी माहिती दिली. डॉ. दिग्विजय बंडगर (इ.एन.टी सर्जन) यांनी नाक, कान व घसा यांच्या आजाराविषयी व उपचाराविषयी माहिती दिली.

सर्व सहभागी जनरल प्रॅक्टिशनरना कार्यशाळेमधील सहभागाबद्दल प्रमाणपत्रे प्रदान करून कार्यशाळेची सांगता झाली.



बेसिक लाईफ सपोर्टचे ट्रेनिंग - सहभागींकडून प्रात्यक्षिक



सहभागी जनरल प्रॅक्टिशनर्स

# समर्थ नर्सिंग कॉलेजमध्ये कर्करोग दिन साजरा

'एसव्हीजेसीटी'(SVJCT) च्या समर्थ नर्सिंग कॉलेज, डेरवणमध्ये दि. ४ फेब्रुवारी २०२२ रोजी कर्करोग दिन साजरा करण्यात आला. कर्करोग दिन साजरा करण्याचा उद्देश कर्करोगाच्या रुग्णांसाठी आहार, व्यायाम या उपचार पद्धतींबद्दल जागरूकता वाढवणे आहे. या कार्यक्रमासाठी उपस्थित विशेष अतिथी डॉ. राहुल रवींद्र (मेडिकल ऑन्कोलॉजिस्ट, टाटा हॉस्पिटल, मुंबई) व डॉ. मोहम्मद चौधरी (ऑक्युपेशनल थेरपिस्ट, टाटा हॉस्पिटल, मुंबई) यांनी या वेळी आपले मौल्यवान विचार विद्यार्थ्यांसमोर मांडले. कर्करोग दिनानिमित्त विविध वर्गातील विद्यार्थ्यांनी भाषणे केली. सर्व शिक्षक कर्मचारी, इंटर्न्स आणि वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थी, रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक देखील कर्करोग दिन साजरा करण्यासाठी उपस्थित होते. या कार्यक्रमाची थीम- 'क्लोज द केअर गॅप' (Close the Care Gap) आहे. तिचा उद्देश कर्करोगाविषयी जागरूकता वाढवून दरवर्षी लाखो मृत्यू रोखणे हा आहे.



*डॉ. राहुल रवींद्र (मेडिकल ऑन्कोलॉजिस्ट, टाटा हॉस्पिटल, मुंबई) मार्गदर्शन करताना*




*कार्यक्रमाला उपस्थित रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक*

# यू. के कॅम्प २०२२

गेली अनेक वर्षे डॉ. संजय देशपांडे यांच्या नेतृत्वाखाली एक ब्रिटिश वैद्यकीय व्यावसायिकांचे पथक डेरवणला येऊन रुग्णोपचार तसेच येथील डॉक्टर्स, नर्सेस आणि विद्यार्थी यांना व्याख्यानांद्वारे आणि प्रात्यक्षिकांद्वारे मार्गदर्शन करीत असे. कोविड महामारीमुळे गतवर्षी ते पथक डेरवणला येऊ शकले नाही. मात्र या वर्षी तो 'यू. के. कॅम्प' ३० जानेवारी ते ४ फेब्रुवारी या कालावधीत ऑनलाईन लेक्चरद्वारे घेण्यात आला. प्रत्यक्ष येऊ न शकल्यामुळे ऑनलाइन लेक्चर्सच्या माध्यमातून त्यांनी आपले व्रत पुढे चालवले. यात त्यांची डेरवण हॉस्पिटलमधील भावनिक गुंतवणूक आणि व्यावसायिक निष्ठाच आम्हाला प्रकर्षाने जाणवली. रेडिओलॉजी, क्रिटिकल केअर, यूरोलॉजी, ॲनेस्थेशिया आणि पेन मॅनेजमेंट, बेसिक ऑर्थोपेडिक आदी गोष्टींचा समावेश त्या व्याख्यानांमध्ये करण्यात आला होता. दरम्यान डॉक्टर्स आणि विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेऊन आपल्या ज्ञानात भर घातली.







*यु.के. कॅम्प २०२२ – ऑनलाईन लेक्चर्स*

## भ. क. ल. वालावलकर रुग्णालयामध्ये सुपर स्पेशालिटी पेडियाट्रिक कार्डिओलॉजी सेवा सुरू.

डॉ. श्रीनिवास एल. आणि डॉ. नीलेश बच्छाव (बाल हृदयरोगतज्ज्ञ, ज्युपिटर हॉस्पिटल, मुंबई) यांची सुपर स्पेशालिटी पेडियाट्रिक कार्डिओलॉजी सेवा दि. १० फेब्रुवारीपासून भ.क.ल. वालावलकर रुग्णालयात सुरू झाली आहे. यापुढे दर महिन्याच्या दुसऱ्या शुक्रवारी ही सेवा उपलब्ध असेल. रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली, खेड, चिपळूण व संगमेश्वर या तालुक्यातील एकूण २४ हृदयाशी संबंधित समस्यांनी ग्रस्त मुलांनी या सेवेचा आजवर लाभ घेतला आहे व त्यांतील ४ रुग्णांची शस्त्रक्रिया योग्य वेळी करण्यात येणार आहे. दि. ५ मार्च रोजी हे तज्ज्ञ डॉक्टर्स परत वालावलकर रुगणलयाला भेट देणार आहेत.





## निरंतर वैद्यकीय शिक्षण

दि. २४. ०२. २०२२ रोजी भ. क. ल. वालावलकर रुरल मेडिकल कॉलेज येथे 'निरंतर वैद्यकीय शिक्षण' योजनेत 'क्षयरोग नियंत्रण व निर्मूलन' या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अनिरुद्ध आठल्ये, जिल्हा वैद्यकीय अधिकारी आणि डॉ. महेंद्र गावडे, जिल्हा क्षयरोग अधिकारी, रत्नागिरी हे मान्यवर लाभले होते. या कार्यशाळेला भ.क.ल. वालावलकर रुग्णालयाचे चेस्ट फिजिशियन डॉ. अमेय परांजपे, डॉ. प्रसन्न नकाते, डॉ. रामबदन चौहान यांचे मार्गदर्शन लाभले. त्या कार्यशाळेत जिल्ह्यातील १०० हून अधिक डॉक्टर्सनी सहभाग घेतला.



*डॉ. अनिरुद्ध आठल्ये*



*डॉ अमेय परांजपे*



*डॉ प्रसन्न नकाते*



*डॉ रामबदन चौहान*

भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : Reception No. (Hospital) : 8847790149 MSW (Social worker) : 9356427731
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com




मालक, मुद्रक, प्रकाशक : श्री. विकासराव वालावलकर यांनी श्रीमुद्रा, १८१, शुक्रवार पेठ, पुणे - २ येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण, जि. रत्नागिरी येथून प्रकाशित केले.
Visit us at https://swamisamarth.com/dervan// संपादिका : डॉ. सौ. सुवर्णा पाटील-९९२१२ ५१६९५,
संपादक मंडळ : सौ. शरयू यशवंतराव-९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर-९५८८४ ७९२२०